# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र/मसंकें/प्रअवा/५४४/२०२२. दिनांक 28 JAN 2022

### जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्र नर्सरीत आंबा शेंडा कलमे १२,००० नग बांधणे व बांधलेल्या आंबा शेंडा कलमांचे २५/०३/२०२२ पर्यंत संगोपण करणे हे प्रस्तावित आहे. आंबा शेंडा कलमे बांधणे व त्याअनुषंगाने इतर काम करणे या कामांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आवश्यक परिमाण व मजुर युनिट |
|---|---|---|
| १) | आंबा रोपे १२,००० नग शेडमध्ये लावून घेणे. | ३० युनिट |
| २) | आंबा अंकुर काडया काढणे | १२,००० नग |
| ३) | आंबा शेंडा कलमे बांधणे | १२,००० नग |
| ४) | बांधलेल्या आंबा शेंडा कलमांना पाणी घालणे, फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, आंबा कलमांवर रोग व किड येवु नये म्हणुन फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे सदर काम हे २५/०३/२०२२ पर्यंत करणे. | ५० युनिट |

उपरोक्त प्रमाणे कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये होणा-या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक : १०/०२/२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभाग प्रक्षेत्रामध्ये आंबा शेंडा कलमे बांधणे व त्याअनुषंगाने इतर कामे ठेका पध्दतीने करणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

- उपरोक्त **कामाच्या अटी व शर्ती**:–

१ ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे दरपत्रक भरणा-याने दरपत्रकासोबत अनामत रक्कम म्हणून रू.५000/- (रू.पाच हजार मात्र) धनादेशाव्दारे भरावी लागणार आहे. धनादेश " डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली" या नांवे 'आरडीसीसी बँक शाखा वाकवली येथे देय' काढावा. दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

(PTO)

Scanned by CamScanner

३ आंबा वडस्टीक या प्रक्षेत्राच्या आंबा झाडांवरून स्वत काढून आंबा शेंडा कलमे बांधुन बांधलेल्या आंबा शेंडा कलमांचे २५ मार्च २०२२ पर्यंत संगोपण करणे.

४ आंबा शेंडा कलमे बांधणीच्या विलाचा पहीला हप्ता आंबा रोपे १२,००० नग शेडमध्ये लावून घेणे आंबा अंकुर काडया १२,००० नग काढणे, आंबा शेंडा कलमे १२,००० नग बांधणे ही कामे पूर्ण झाल्यानंतर अंदाज पत्रकातील दरानुसार अदा करणेत येईल.

५ आंबा शेंडा कलमे ठेका अंतर्गत विलाचा दुसरा हप्ता बांधलेल्या आंबा शेंडा कलमांना पाणी घालणे फुट काढणे, पिशवीतील गवत काढणे, आंबा कलमांवर रोग व किड येवू नये म्हणुन फवारणी काम करणे, सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे इत्यादी कामे केल्यानंतर आदा करणेत येईल.

६ आंबा शेंडा कलमे जगण्याचे प्रमाण ६० % गृहीत धरूनच आपणास निविष्टा पुरविण्यात येतील आंबा शेंडा कलम यशस्वी होण्याचे प्रमाण ६० %पेक्षा कमी आल्यास कमी असलेल्या कलमांची वसुली प्रती कलम रु.२.५० पै.प्रती नग याप्रमाणे अंतिम विलामधून अथवा अनामत रकमेतून वसूल करणेत येईल.

७ प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधितांकडे जमा करावयाचे आहे.

८ ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही. कलमांबाबत दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९ ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बॅंक खाती N.E.F.T./R.T.G.S. धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

१० ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जवाबदारी ठेकेदाराची राहील त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

११ ठेक्याच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान/चोरी झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना असेल व त्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

१२ ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१३ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांकSLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१४ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रु.१००/- च्या बॉंड पेपरवर करणे बंधनकारक राहील कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१५. प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

**प्रत माहितीसाठी सादर...**

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड

Scanned by CamScanner